# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ कार्यालय, इमारत दुसरा व चौथा मजला, सर्व्हे नं. ८३२ ए, भांबुर्डा, शिवाजी नगर, पुणे- ४११००४

Phone No. - ०२०-२९७०९६१७ Email: mscepune@gmail.com Website: www.mscepune.in

**कालमर्यादित**
**अधिसूचना**
**प्रसिध्दी - संकेतस्थळावर**

जा.क्र.मरापप/वि.से.प्र.प/अधिसूचना/२०२४/ 2550
दि. 12 /०६/२०२४

प्रति,

मा. आयुक्त (शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१.

**विषय:-** विभागीय सेवा प्रवेशोत्तर परीक्षा २०२४ अधिसूचना
परीक्षा दिनांक ०९/०८/२०२४ ते दिनांक ११/०८/२०२४

१) लिपिक/लिपिक तथा टंकलेखक/टंकलेखक पदांसाठी सेवा प्रवेशोत्तर परीक्षा
२) पर्यवेक्षक पदासाठी अर्हता परीक्षा.
३) सहाय्यक शिक्षण उपनिरिक्षक व त्या संवर्गातील समकक्ष पदावरील कार्यरत अधिकाऱ्यांसाठी विभागीय परीक्षा.

महोदय,

उपरोक्त विषयामध्ये नमूद केलेल्या तिनही संवर्गाची विभागीय सेवा प्रवेशोत्तर परीक्षा दिनांक ०९/०८/२०२४ ते दिनांक ०११/०८/२०२४ या कालावधीत घेण्यात येणार आहे. आपल्या कार्यालयातील आणि आपल्या अधिकार क्षेत्रातल्या दुय्यम कार्यालयातील शासन अधिसूचना क्र.इएक्सएम/१२६४/सी. दिनांक ३०/०७/१९७३ मधील परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केलेल्या नियमांनुसार व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक:विपधो२६२०/प्र.क्र.१६/का.१७ दि. ३१ मार्च, २०२१ नुसार लिपिक/लिपिक तथा टंकलेखक/टंकलेखक संवर्गातील परीक्षेस बसण्यास पात्र असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी, पर्यवेक्षकीय पदासाठी अर्हता परीक्षेस पात्र असणाऱ्या कर्मचाऱ्यानी तसेच आपल्या कार्यालयातील जे कर्मचारी शासन अधिसूचना क्र.एमईएस/१०७४/५२८/II-XIV दिनांक २०/०२/१९८० नुसार व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक:विपधो२६२०/प्र.क्र.१६/का.१७ दि. ३१ मार्च, २०२१ नुसार "सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक" व समकक्ष पदावरील संवर्गासाठी परीक्षेस बसण्यास पात्र आहेत, अशा **सर्व उमेदवारानी परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर दि. १७/०६/२०२४ ते दि. ३०/०६/२०२४ पर्यंत ऑनलाईन आवेदनपत्रे भरावयाचे आहेत. तसेच उमेदवारांनी ऑनलाईन भरलेल्या आवेदनपत्राची प्रत (Hard copy) शिक्षण उपसंचालक / नियुक्ती प्राधिकारी / कार्यालय प्रमुख यांचेमार्फत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांना दि. ०८/०७/२०२४ पर्यंत पाठविणे बंधनकारक आहे.** सदरचे आवेदनपत्र परिषदेस प्राप्त झाल्यानंतरच उमेदवार परीक्षेस पात्र ठरणार आहेत.

उपरोक्त संवर्गाची ऑनलाईन आवेदनपत्रे नियमानुसार विभागीय सेवा प्रवेशोत्तर परीक्षेस पात्र ठरणाऱ्या उमेदवारांनी दि. ३०/०६/२०२४ पर्यंत भरावयाची आहेत. कोणत्याही कर्मचाऱ्यांची आवेदनपत्रे परस्पर स्विकारली जाणार नाहीत. उपरोक्त तिनही संवर्गाच्या परीक्षेसंबंधी सर्वसाधारण माहिती पुढील प्रमाणे देण्यात आली आहे.

अनुत्तीर्ण परीक्षार्थीबाबत त्यांनी यापूर्वी किती संधी घेतलेल्या आहेत याची स्वतंत्र यादी कार्यालयीन प्रमुखाच्या स्वाक्षरीने सादर करावी. याबाबत उपरोक्त उल्लेखित अधिसूचनांच्या नियमानुसार कार्यवाही करावी.

Scanned with OKEN Scanner

# लिपिक/लिपिक तथा टंकलेखक/टंकलेखक पदांसाठी सेवा प्रवेशोत्तर परीक्षा

महाराष्ट्र शासन राजपत्र क्र.इएक्सएम/१२६४-सी. दिनांक ३०/०७/१९७३ मधील परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केलेल्या नियमाप्रमाणे व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक:विपधो२६२०/प्र.क्र.१६/का.१७ दि. ३१ मार्च, २०२१ नुसार तसेच खालील अटी पूर्ण करणारे उमेदवार सदर परीक्षेसाठी पात्र आहेत.

१) ज्या लिपिकांचे खात्यामार्फत प्रशिक्षण पूर्ण झालेले आहे.
२) कनिष्ठ लिपिक व सरळ सेवेत निवड झालेले किंवा प्रौढ शिक्षण संचालनालयाकडून समायोजनाने वर्ग झालेले वरिष्ठ लिपिक
३) जे लिपिक यापूर्वी झालेल्या परीक्षेस बसून अनुत्तीर्ण झालेले आहेत.
४) परीक्षेसाठी प्रविष्ठ होण्यासाठी प्रशिक्षण पूर्ण झालेले असणे आवश्यक आहे.

कोणत्याही कारणास्तव प्रशिक्षण पूर्ण झाले नसल्यास सदर लिपिक/लिपिक तथा टंकलेखक/टंकलेखक यांना परीक्षेस बसता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

➢ **उत्तीर्णतेचे निकष:-** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक:विपधो२६२०/प्र.क्र.१६/का.१७ दि. ३१ मार्च, २०२१ नुसार अन्वये सदर परीक्षेसाठी उत्तीर्ण होण्यासाठीचे निकष खालीलप्रमाणे आहेत.

१) लिपिक सेवा प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक विषयात किमान ५०% गुण मिळणे आवश्यक आहेत.
२) एखाद्या परीक्षार्थ्यास एका विषयात ५० किंवा ५०% पेक्षा अधिक गुण मिळाल्यास त्यास त्या विषयात पुढील परीक्षेसाठी सूट मिळू शकते. तथापि त्यासाठी अशा उमेदवारांनी ऑनलाईन आवेदनपत्रात तसे नमूद करुन त्या वर्षाच्या गुणपत्रकांची प्रत upload करणे आवश्यक आहे. अन्यथा परीक्षार्थी सर्व विषयात बसू इच्छितो, असे गृहित धरले जाईल व त्याप्रमाणे निकाल जाहीर केला जाईल.
३) एखाद्या परीक्षार्थ्यास एकूणात ५०% पेक्षा जास्त गुण प्राप्त झाले असतील व तो एका विषयात अनुत्तीर्ण असेल तर त्यास सर्व परीक्षा पुन्हा द्यावी लागणार नाही. ज्या विषयात तो नापास असेल त्याच विषयाची परीक्षा द्यावी लागेल.

➢ **परीक्षेचे वेळापत्रक :-**

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>दिनांक व वार</th><th>वेळ</th><th>विषय</th><th>गुण</th></tr>
<tr><td rowspan="2">१</td><td rowspan="2">०९/०८/२०२४<br>शुक्रवार</td><td>सकाळी<br>१०.०० ते १.००</td><td>पेपर क्र. १<br>C-१ कार्यालयीन व्यवस्थापन (पुस्तकांशिवाय)</td><td>१००</td></tr>
<tr><td>दुपारी<br>२.०० ते ५.००</td><td>पेपर क्र. २<br>C-२ कार्यालयीन पध्दती, टिपण्णी व मसुदा लेखन (पुस्तकांशिवाय)</td><td>१००</td></tr>
<tr><td rowspan="3">२</td><td rowspan="3">१०/०८/२०२४<br>शनिवार</td><td>सकाळी<br>१०.०० ते १.००</td><td>पेपर क्र. ३<br>C-३ सर्वसाधारण व्याप्तीचे नियम व नियमावली (पुस्तकांशिवाय)</td><td>१००</td></tr>
<tr><td rowspan="2">दुपारी<br>२.०० ते ५.००</td><td>पेपर क्र. ४<br>C-४ शिक्षण खात्याचे नियम व विनियम (पुस्तकांसह)</td><td>१००</td></tr>
<tr><td>पेपर क्र. ४<br>C-४ Arts कला खात्याचे नियम व विनियम (पुस्तकांसह)</td><td>१००</td></tr>
<tr><td rowspan="2">३</td><td rowspan="2">११/०८/२०२४<br>रविवार</td><td rowspan="2">सकाळी<br>१०.०० ते १.००</td><td>पेपर क्र. ५<br>C-५ शिक्षण विभागाचे व्यवस्थापन (पुस्तकांशिवाय)</td><td>१००</td></tr>
<tr><td>पेपर क्र. ५<br>C-५ Arts कला विभागाचे व्यवस्थापन व यंत्रणा वगैरे (पुस्तकांशिवाय)</td><td>१००</td></tr>
</table>

शासन नियमानुसार पात्र उमेदवारांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यात यावे. या **परीक्षेसाठी उमेदवार पात्र आहेत याची पडताळणी करण्याची पूर्ण जबावदारी संबंधित शिक्षण उपसंचालक /नियुक्ती प्राधिकारी / कार्यालय प्रमुख यांची राहील.**

Scanned with OKEN Scanner

# पर्यवेक्षकीय पदासाठी अर्हता परीक्षा

महाराष्ट्र शासन राजपत्र क्र.इएक्सएम/१२६४/सी, दि. ३०/०७/१९७३ मध्ये नमूद केलेल्या नियमाप्रमाणे व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक:विपधो२६२०/प्र.क्र.१६/का.१७ दि. ३१ मार्च, २०२१ नुसार तसेच सध्या मुख्य लिपिक पदावर काम करणारे तसेच यापूर्वी परीक्षेस बसून अनुत्तीर्ण झालेले या संवर्गातील कर्मचारी या परीक्षेसाठी पात्र आहेत.

➢ **उत्तीर्णतेचे निकष:-** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक:विपधो२६२०/प्र.क्र.१६/का.१७ दि. ३१ मार्च, २०२१ अन्वये सदर परीक्षेसाठी उत्तीर्ण होण्यासाठीचे निकष खालीलप्रमाणे आहेत.

१) पर्यवेक्षकीय पदासाठी अर्हता परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक विषयात किमान ५०% गुण आवश्यक आहेत.

२) परीक्षार्थ्यास ज्या विषयात ६०% किंवा त्याहुन अधिक गुण मिळाले असतील त्या विषयास पुढील परीक्षेसाठी सूट मिळू शकते. तथापि त्यासाठी अशा उमेदवारांनी ऑनलाईन आवेदनपत्रात तसे नमूद करुन त्या वर्षाच्या गुणपत्रकांची प्रत upload करणे आवश्यक आहे. अन्यथा उमेदवार सर्व विषयात बसू इच्छितो, असे गृहित धरले जाईल व त्याप्रमाणे निकाल जाहीर केला जाईल.

३) एखाद्या परीक्षार्थ्यास ज्या विषयात ६०% पेक्षा जास्त गुण प्राप्त झाले असतील तर त्यास सर्व परीक्षा पुन्हा द्यावी लागणार नाही. ज्या विषयात तो अनुत्तीर्ण असेल त्याच विषयाची परीक्षा द्यावी लागेल.

➢ **परीक्षेचे वेळापत्रक :-**

| अ.क्र. | दिनांक व वार | वेळ | विषय | गुण |
|---|---|---|---|---|
| १ | ०९/०८/२०२४ शुक्रवार | सकाळी १०.०० ते १.०० | **पेपर क्र. १** S-१ कार्यालयीन व्यवस्थापन, नियंत्रण व शिस्त (पुस्तकांशिवाय) | १०० |
| | | दुपारी २.०० ते ५.०० | **पेपर क्र. २** S-२ सर्वसाधारण व्याप्तीचे नियम व नियमावली भाग-१ (पुस्तकांसह) | १०० |
| २ | १०/०८/२०२४ शनिवार | सकाळी १०.०० ते १.०० | **पेपर क्र. ३** S-३ सर्वसाधारण व्याप्तीचे नियम व नियमावली भाग-२ (पुस्तकांसह) | १०० |
| | | दुपारी २.०० ते ५.०० | **पेपर क्र. ४** S-४ शिक्षण विभागाचे नियम व विनियम (पुस्तकांसह) | १०० |
| | | | **पेपर क्र. ४** S-४ Arts कला खात्याचे नियम व विनियम (पुस्तकांसह) | १०० |

शासन नियमानुसार पात्र उमेदवारांनीच ऑनलाईन आवेदनपत्रे भरावेत. या **परीक्षेसाठी कर्मचारी पात्र आहेत याची पडताळणी करण्याची पूर्ण जबाबदारी संबंधित शिक्षण उपसंचालक / नियुक्ती प्राधिकारी / कार्यालय प्रमुख यांची राहील.**

Scanned with OKEN Scanner

## महाराष्ट्र शिक्षण सेवा वर्ग III (प्रशासन शाखा) तथा सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक व त्या संवर्गातील समकक्ष पदावरील कार्यरत अधिकाऱ्यांसाठी विभागीय परीक्षा

महाराष्ट्र शासन राजपत्र क्र.एमईएस/१०७४/५२८/II-XIV दिनांक २०/०२/१९८० नुसार व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक:विपधो२६२०/प्र.क्र.१६/का.१७ दि. ३१ मार्च, २०२१ नुसार_आपल्या कार्यालयातील आणि आपल्या अधिकार क्षेत्रातील शिक्षण विभागातील जी दुय्यम कार्यालये आहेत त्यातील सहाय्यक शिक्षण उपनिरिक्षक व समकक्ष संवर्गातील अधिकारी या परीक्षेस बसण्यास पात्र आहेत.

महाराष्ट्र शासन राजपत्र क्र.एमईएस/१०७४/५२८/II-XIV दिनांक २०/०२/१९८० अन्वये व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक:विपधो२६२०/प्र.क्र.१६/का.१७ दि. ३१ मार्च, २०२१ नुसार_त्या संवर्गातील जे कर्मचारी परीक्षेस बसण्यास पात्र आहेत त्यांना नियमित म्हणून तसेच जे कर्मचारी यापूर्वी परीक्षेस बसून अनुत्तीर्ण झालेले आहेत अशा कर्मचाऱ्यांना या परीक्षेस बसता येईल.

➢ **उत्तीर्णतेचे निकष:-** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक:विपधो२६२०/प्र.क्र.१६/का.१७ दि. ३१ मार्च, २०२१ अन्वये सदर परीक्षेसाठी उत्तीर्ण होण्यासाठीचे निकष खालीलप्रमाणे आहेत.

१) सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक व त्या संवर्गातील अधिकारी यांचेसाठी सेवा प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक विषयात किमान ५०% गुण मिळणे आवश्यक आहेत.

२) परीक्षार्थ्यास ज्या विषयात ६०% किंवा त्याहुन अधिक गुण मिळाले असतील त्या विषयास पुढील परीक्षेसाठी सूट मिळू शकते. तथापि त्यासाठी परीक्षेच्या आवेदनपत्रासोबत वेगळा अर्ज करुन मान्यता घेणे आवश्यक आहे. हा नियम पुर्वीच्या परीक्षेबाबतही लागू आहे. उमेदवारांनी ऑनलाईन आवेदनपत्रात तसे नमूद करुन त्या वर्षाच्या गुणपत्रकाची प्रत upload करणे आवश्यक आहे. अन्यथा उमेदवार सर्व विषयास बसू इच्छित आहे, असे गृहित धरुन त्यानुसार निकाल जाहीर करण्यात येईल.

३) एखाद्या परीक्षार्थ्यास ज्या विषयात ६०% पेक्षा जास्त गुण प्राप्त झाले असतील तर त्यास सर्व परीक्षा पुन्हा द्यावी लागणार नाही. ज्या विषयात तो अनुत्तीर्ण असेल त्याच विषयाची परीक्षा द्यावी लागेल.

➢ **परीक्षेचे वेळापत्रक :-**

| अ.क्र. | दिनांक व वार | वेळ | विषय | गुण |
|---|---|---|---|---|
| १ | ०९/०८/२०२४ शुक्रवार | सकाळी १०.०० ते १.०० | **पेपर क्र. १** AD-१ प्रचलित शैक्षणिक प्रश्न (पुस्तकांशिवाय) | १०० |
| | | दुपारी २.०० ते ५.०० | **पेपर क्र. २** AD-२ शिक्षण खात्याचे नियम (पुस्तकांशिवाय) | १०० |
| २ | १०/०८/२०२४ शनिवार | सकाळी १०.०० ते १.०० | **पेपर क्र. ३** AD-३ सेवा नियम (पुस्तकांसह) | १०० |
| | | दुपारी २.०० ते ५.०० | **पेपर क्र. ४** AD-४ लेखा व आर्थिक पद्धती (पुस्तकांसह) | १०० |

शासन नियमानुसार पात्र व्यक्तींचीच ऑनलाईन आवेदनपत्रे भरुन घ्यावीत. या **परीक्षेसाठी कर्मचारी पात्र आहेत याची पडताळणी करण्याची पूर्ण जबाबदारी संबंधित शिक्षण उपसंचालक / नियुक्ती प्राधिकारी / कार्यालय प्रमुख यांची राहील.**

Scanned with OKEN Scanner

➢ **उपरोक्त तिनही संवर्गाच्या परीक्षेसंबंधी सर्वसाधारण माहिती पुढील प्रमाणे :-**

१. **आवेदनपत्रे भरण्याची मुदत :-** सदर तीन संवर्गाच्या परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या पात्र उमेदवारांनी संबंधित शिक्षण संचालक / विभागीय शिक्षण उपसंचालक (नियुक्ती अधिकारी) यांचेमार्फत परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर **दि. १७/०६/२०२४ ते दि. ३०/०६/२०२४** पर्यंत ऑलनाईन आवेदनपत्रे भरावयाचे आहेत.

तसेच उमेदवारांनी ऑनलाईन भरलेल्या आवेदनपत्राची प्रत (Hard copy) व परीक्षा शुल्क भरल्याची प्रत (Hard copy) शिक्षण उपसंचालक / नियुक्ती प्राधिकारी / कार्यालय प्रमुख यांचेमार्फत त्यांच्या शिफारशीसह महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांना **दि. ०८/०७/२०२४ पर्यंत पाठविणे बंधनकारक आहे**. सदरचे आवेदनपत्र परिषदेस प्राप्त झाल्यानंतरच उमेदवार परीक्षेस पात्र ठरणार आहेत. ज्या उमेदवारांचे आवेदनपत्रे विहित मुदतीत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचेकडे प्राप्त होतील, असेच उमेदवार परीक्षेसाठी पात्र होतील, याची नोंद घ्यावी.

२. **परीक्षा शुल्क :-** तीनही संवर्गाच्या परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या पात्र उमेदवारांनी परीक्षा शुल्क **रु. ९५०/- (रुपये पाचशे)** ऑनलाईन भरावयाचे आहेत.

३. **माध्यम :-** परीक्षेसाठी सर्व विषयांसाठी माध्यम **मराठी** राहील.

४. **पुस्तकांसहित विषय :-** जे विषय पुस्तकांसहित लिहावयाचे आहेत, त्यासाठी आवश्यक असणारी पुस्तके/त्यांच्या प्रमाणित छायांकित प्रती (फक्त शासकीय प्रकाशने) उमेदवारांनी परीक्षेच्या दिवशी स्वत: आणावयाची आहेत. कोणत्याही परिस्थितीत खाजगी प्रकाशनाची पुस्तके वापरण्यास परवानगी दिली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

५. **प्रवेशपत्रे :-** ऑनलाईन फॉर्म व शुल्क भरलेल्याच उमेदवारांची प्रवेशपत्रे परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर परीक्षेपूर्वी १० दिवस अगोदर उपलब्ध होतील. सदर प्रवेशपत्रे काढून घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवारांची असेल.

६. **परीक्षा केंद्र :-** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या आपल्या प्रवेशपत्रामध्ये परीक्षा केंद्राचे नाव नमुद केले जाईल.

७. **गुणपडताळणी :-** सदर परीक्षेचा निकाल जाहीर झालेनंतर ज्या उमेदवारांना प्राप्त गुणांबाबत काही शंका असल्यास अशा उमेदवारांनी गुणांची पडताळणी अर्ज निकाल जाहीर झाल्यापासून १५ दिवसांच्या आत विभागीय शिक्षण उपसंचालक / नियुक्ती अधिकारी यांचेमार्फत परिषदेस सादर करावा. विहित मुदती नंतर प्राप्त होणाऱ्या गुणपडताळणी अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच गुणपडताळणीसाठी अर्ज केलेल्या विषयाच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची केवळ गुणपडताळणी करुन घेता येईल. **कोणत्याही परिस्थितीत उत्तरपत्रिकेचे पुर्णमुल्यांकन केले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.**

८. **परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या उमेदवारांसाठी महत्वाच्या अटी व शर्ती :-**

८.१. सदर परीक्षेसाठी उपस्थित राहणाऱ्या उमेदवाराकडे परिषदेने दिलेल्या विहीत नमुन्यातील प्रवेशपत्र सक्षम अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीसह सांक्षांकित करुन परीक्षेच्या वेळी स्वत: जवळ बाळगणे बंधनकारक राहील. तसेच स्वत:ची ओळख (Identification) पटवून देणेकरिता मूळ प्रवेशपत्रासह शासकीय ओळखपत्र (आधार कार्ड/पॅनकार्ड/वाहन परवाना/निवडणूक आयोगाचे ओळखपत्र यापैकी एक) असणे आवश्यक राहील.

८.२. परीक्षेसाठी उमेदवाराने परीक्षा केंद्रावर अर्धातास अगोदर उपस्थित राहणे आवश्यक आहे. परीक्षा सुरु झालेनंतर अर्धा तासानंतर उमेदवारास परीक्षा केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही.

८.३. परीक्षा केंद्रातील अथवा इतर कोणत्याही परीक्षा हॉल (कक्ष) मध्ये कोणत्याही प्रकारचे इलेक्ट्रॉनिक साहित्य (मोबाईल, ब्लुटूथा, कॅलक्युलेटर, स्मार्ट वॉच इ.) स्वत:जवळ बाळगणेस सक्त मनाई आहे.

Scanned with OKEN Scanner

८.४. परीक्षेदरम्यान जे पेपर / विषय पुस्तकांशिवाय आहेत, अशा विषयाचे पेपर सुरु असताना उमेदवारांकडे पुस्तके / कॉपी साहित्य आढळल्यास सदरची बाब गैरवर्तणूक समजून सदर उमेदवारावर Provision of Mal Practices Act १९८२ अंतर्गत कायदेशीर कारवाई करणेत येईल.

८.५. परीक्षेसाठी प्रविष्ट झालेल्या उमेदवारांना परिषदेमार्फत कोणतीही पुस्तके पुरविली जाणार नाहीत.

८.६. परीक्षेच्या वेळी उपस्थित उमेदवारास प्रवासभत्ता व दैनिकभत्ता परिषदेमार्फत अदा केला जाणार नाही.

**९. उमेदवाराने परीक्षा कक्षामधून बाहेर जाणेबाबत :-**

९.१. प्रश्नपत्रिका वाटप केल्यापासून पाऊणतास संपेपर्यंत कोणत्याही उमेदवाराला परीक्षा कक्षाबाहेर जाता येणार नाही.

९.२. परीक्षा चालू असताना एखाद्या उमेदवाराला प्रसाधन कक्षात जावयाचे असेल तर त्याने / तिने परीक्षा कक्षाबाहेर जाणेपूर्वी पर्यवेक्षकाची परवानगी घेणे आवश्यक राहील. तशी परवानगी घेतली नसल्यास त्यास / तिस परीक्षा कक्षामध्ये पून्हा प्रवेश दिला जाणार नाही.

९.३. एखाद्या उमेदवारास परीक्षा सुरु झाल्यानंतर पाऊण तासानंतर परंतू परीक्षेची वेळ संपण्यापूर्वी परीक्षा कक्षाबाहेर जावयाचे असेल तर त्याने / तिने पर्यवेक्षकांकडे त्याचे / तिची प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका जमा करणे आवश्यक राहील. जे उमेदवार पेपरच्या शेवटच्या वेळेपर्यंत परीक्षा कक्षात राहतील त्यांची / तिची उत्तरपत्रिका पर्यवेक्षक घेईपर्यंत आपल्या जागेवर बसून राहणे आवश्यक आहे.

उपरोक्त ९.१., ९.२. व ९.३. च्या अधीन राहून कोणत्याही परिस्थितीत उमेदवाराने कोणत्याही कारणास्तव पर्यवेक्षकाच्या परवानगीशिवाय आपली जागा सोडू नये.

१०. उमेदवाराने उत्तरपत्रिकेमध्ये प्रश्नांचे उपप्रश्न सोडविताना (अ, ब, क, ड) सलगरित्या सोडवावेत. प्रश्नाचा एक भाग एका पृष्ठावर व दुसरा भाग काही पृष्ठे सोडून सोडविल्यास तो उपप्रश्न दुर्लक्षित करण्यात येईल.

११. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने विभागीय परीक्षा संदर्भात केलेल्या सूचनांचे उमेदवाराने अत्यंत काळजीपूर्वक पालन करावे. सदर सूचनांचे पालन न केल्यास संबंधित उमेदवारास परीक्षा कक्षाबाहेर काढणे, गुण वजा करणे, उमेदवाराची चालू परीक्षेची संपादणूक रद्द करणे व पुढील परीक्षांना प्रतिबंध करणे इत्यादी शिक्षेस संबंधित उमेदवार पात्र राहील. संबंधित उमेदवारास शिक्षा देण्याचा अंतिम अधिकार आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचा राहील.

१२. उमेदवारांनी कागदाची बचत म्हणून उत्तरपत्रिकेतील पृष्ठांच्या दोन्ही बाजूस लिहीणे बंधनकारक राहील.

१३. उत्तरपत्रिकेवर ओळख पटेल असे कोणतेही आक्षपार्ह लिखाण आढळून आल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

**आपली विश्वासू,**

**(अनुराधा ओक)**
**आयुक्त,**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-४.

**प्रत : माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना :-**

१) मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे-१
२) मा. संचालक, (माध्य.व उच्च माध्य.) शिक्षण संचालनालय,मध्यवर्ती इमारत पुणे-१
३) मा. संचालक, (योजना) महाराष्ट्र राज्य, पुणे-१
४) मा. संचालक, शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य, सदाशिव पेठ, पुणे-३०.
५) मा. शिक्षण संचालक (अल्प संख्यांक व प्रौढ शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१
६) मा. शिक्षण संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, पुणे
७) मा. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, डॉ. स.ना. रोड जे.जे. स्कूल ऑफ आर्टस कपांऊड, मुंबई ०१
८) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)

यांना माहितीस्तव व आपल्या अखत्यारितील कार्यालयातील उपरोक्त संवर्गातील कर्मचाऱ्यांना सदर परीक्षेची माहिती देण्याकरिता अग्रेषित.

Scanned with OKEN Scanner